# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**कार्यासन क्रमांक १०**

क्रमांक विकाअ/शिक्षण/शिष्यवृत्ती/२०१५/20

दिनांक :- 2 JAN 2016

प्रति,

**प्राचार्य,**
शासकीय/अनुदानित विनाअनुदानित,
अभियांत्रिकी पदवीका संस्था,
अमरावती विभाग.

**विषय :- शासकीय/खाजगी तंत्रनिकेतनामधील ज्या तंत्रनिकेतनामध्ये शिष्यवृत्ती वाटपामध्ये घोटाळा/अनियमितता झाली आहे, अश्या संस्थांची माहीती सादर करण्याबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/शिष्यवृत्ती/२०१५/२७७३ दि. ५ नोव्हे २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेमध्ये शिष्यवृत्ती वाटपामध्ये घोटाळा/अनियमितता झालेली असल्यास त्याबाबतची माहीती शासनपत्रात नमुद मुद्यांच्या अनुषंगाने वर्ष निहाय (२०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५) माहीती त्यासोबत जोडलेल्या विवरणपत्रात दिनांक १७/११/२०१५ पर्यंत या कार्यालयास सादर करण्यास कळविलेले होते. तरी देखील **शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती, यवतमाळ, खामगाव, शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन, यवतमाळ, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे तंत्रनिकेतन, बडनेरा, व नगर परिषद तंत्रनिकेतन, अचलपुर** या संस्था वगळता विभागातील इतर संस्थांनी सदर माहीती या कार्यालयास सादर केलेली नाही, यावरुन असे निदर्शनास येते की, आपण वरीष्ठ कार्यालयाचे निर्देशाचे पालन करीत नाही, ही गंभिर बाब आहे.

तेव्हा याव्दारे आपणास पुनश्चः कळविण्यात येते की, सदर पत्रान्वये मागितलेली माहीती या कार्यालयास **दिनांक ६/१/२०१६** पर्यंत या कार्यालयास सादर करावी अन्यथा आपले नाव तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.